


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २६४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०६ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## आम्हाला हरवलं गेलंय! राजीनाम्याचा प्रश्नच येत नाही; ममता बॅनर्जी कडाडल्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला. या पराजयानंतर ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषद घेतली. आम्ही निवडणूक हरलेलो नाही. आम्हाला हरवलं गेलं आहे. भाजपनं निवडणूक आयोगाचा वापर करुन निवडणूक जिंकली असल्याचा गंभीर आरोप बॅनर्जी यांनी केला.

आमचा लढा भाजप विरोधात नव्हे, तर निवडणूक आयोगाशी होता. मी माझ्या उभ्या आयुष्यात अशा प्रकारची निवडणूक पाहिलेली नाही. निवडणूक आयोग मुख्य व्हिलन असल्याचं ममता बॅनर्जी म्हणाल्या. 'भाजपनं निष्पक्षपणे निवडणूक लढवली असती आणि विजय मिळवला असता तर माझी कोणतीही तक्रार नसती. पण आम्ही हरलेलो नाही. भाजपनं विजय चोरलेला आहे. त्यांनी एसआयआरचा उपयोग करुन ९० लाख मतदारांची नावं हटवली. आम्ही न्यायालयात गेल्यावर ३२ लाख नावं पुन्हा मतदारयाद्यांमध्ये जोडण्यात आली. पण यानंतर आणखी ७ लाख नावं जोडली गेली,' अशी आकडेवारी बॅनर्जी यांनी सांगितली.

'मी माझ्या आयुष्यात अशा प्रकारची निवडणूक पाहिलेली नाही. २००४ पासून असा प्रकार पाहिला नव्हता.

हा प्रकार भयंकर आहे. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहांनी मिळून आमचा पराभव केला. आमच्या पराजयासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न करण्यात आले. भाजप कार्यकर्त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली,' असा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला.

आम्ही निवडणूक हरलेलो नाही. त्यामुळे राजीनामा देण्याचा प्रश्नच येत नाही, असं ममता बॅनर्जी म्हणाल्या. तुम्ही राजभवनला जाणार का, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर आम्ही नैतिकदृष्ट्या जिंकलेलो आहोत.



मी लोकभवनला जाऊन राजीनामा देणार नाही. पक्षाच्या सदस्यांसोबत चर्चा करुन पुढील रणनीती ठरवेन. मी आता भाजपचे अत्याचार आणखी सहन करणार नाही. मी रस्त्यावर परतेन. आमची लढाई भाजपशी नव्हती, तर निवडणूक आयोगाशी होती. निवडणूक आयोगानं भाजपसाठी काम केलं, असा दावा त्यांनी केला.

इंडिया आघाडी माझ्यासोबत आहे. सोनिया गांधींनी मला फोन केला होता. राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, उद्धव ठाकरे, हेमंत सोरेन आणि तेजस्वी यादव यांनीही मला फोन केले. इंडिया आघाडी तुमच्या सोबत असल्याचा विश्वास त्यांनी दिला. अखिलेश यादव उद्या पश्चिम बंगालमध्ये येत आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

## मुंबईतील कामाठीपुऱ्याचा कायापालट होणार
### म्हाडा उभारणार बहुमजली टोलेजंग इमारती

**अक्षराज : संजय पंडित**




**दि.०५, मुंबई :** मुंबईतील कामाठीपुरा परिसराच्या पुनर्विकासाला अखेर गती मिळाली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी म्हाडाकडून विकासकांना 'स्वीकृती पत्र' देण्यात आले आहे. गृहनिर्माण विभागाच्या अंतिम मंजुरीनंतर ही प्रक्रिया पूर्ण झाली असून, प्रत्यक्ष कामाला दिवाळीनंतर सुरुवात होण्याची शक्यता आहे. कामाठीपुरा पुनर्विकास प्रकल्पामुळे या परिसराचा चेहरामोहरा बदलण्याची अपेक्षा आहे. रहिवाशांना सुरक्षित आणि आधुनिक घरे मिळणार असल्याने या प्रकल्पाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

या प्रकल्पांतर्गत कामाठीपुरा परिसरात ६० ते ६५ मजल्यांच्या टोलेजंग इमारती उभारल्या जाणार आहेत. सुमारे ३४ एकर क्षेत्रावर पसरलेल्या या भागात सध्या ९४३ मोडकळीस आलेल्या जुन्या इमारती आहेत. या इमारतींमध्ये ६,६२५ निवासी आणि १,३७६ अनिवासी युनिट्स असून, एकूण सुमारे ८,००१ रहिवासी आणि ८०० जमीन मालक येथे वास्तव्यास आहेत. या सर्वांचे पुनर्वसन करून त्यांना आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा इमारतींमध्ये घरे देण्याचा म्हाडाचा मानस आहे.

दरम्यान पुनर्विकासानंतर प्रत्येक पात्र रहिवाशाला सुमारे ५०० चौरस फुटांचे घर मिळणार आहे. हा प्रकल्प टप्प्याटप्प्याने राबवला जाणार असून, तो पूर्ण होण्यासाठी अंदाजे ७ वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने काढलेल्या निविदेत 'भागीरथी हाउसिंग प्रायव्हेट लिमिटेड' आणि 'कामाठी डेव्हलपर्स' यांनी संयुक्तपणे सहभाग घेतला होता. त्यांची निविदा पात्र ठरली असून, त्यांच्यावरच या प्रकल्पाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

स्वीकृती पत्र मिळाल्यानंतर विकासकांना ४५ दिवसांच्या आत बँक गॅरंटी जमा करावी लागणार आहे. त्यानंतर म्हाडासोबत अधिकृत करार होऊन कार्यादेश (Work Order) दिला जाईल. पुढील टप्प्यात विकासकांकडून संपूर्ण प्रकल्पाचा 'मास्टर प्लॅन' तयार केला जाणार आहे. पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विकासकांना विक्रीयोग्य बांधकाम करता येईल. या विक्रीयोग्य क्षेत्रापैकी ८.२५ टक्के हिस्सा म्हाडाला मिळणार असून, त्यातून सुमारे ९०० ते १००० घरे म्हाडाच्या ताब्यात येतील. ही घरे लॉटरी पद्धतीने सर्वसामान्य नागरिकांसाठी विक्री उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

## चंद्रपूरकरांना प्रदुषणाने ग्रासले, ३० पैकी २६ दिवस वातावरणात दुषित हवा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** वाढत्या उष्णतेसोबतच आता नागरिकांना वाढत्या प्रदुषणाचाही त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाळ्यात पानझड, रस्त्यावरील धुळीचे कण, ज्वलनशील पदार्थ, वाहनातून निघणारा धूर यामुळे वातावरणातील हवेच्या प्रदुषणात कमालीची वाढ झाली. एप्रिल महिन्याचा विचार करता यामध्ये ३० पैकी तब्बल २६ दिवस प्रदुषणाचा विळखा अधिक असल्यामुळे नागरिकांना विविध प्रकारच्या आरोग्याच्या समस्या उद्भवू लागल्या आहे अशी माहिती पर्यावरण व हवामान अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी दिली.

साधारणपणे आरोग्याचा विचार करता ०-५० एक्यूआर हा आरोग्याच्या दृष्टीने सर्वात चांगला मानला जातो. परंतू एप्रिल महिन्यात मात्र असा दिवसच न आढळल्यामुळे प्दुषणाच्या गुणांकात कॅालीची वाढ झालेली दिसून येत आहे. तर ५१-१०० हा एक्यूआय त्यामानाने समाधानकारक मानला जातो.



मात्र केवळ ४ दिवसाचा विचार करता नागरिकांना प्रदुषणापासून काही प्रमाणात मुक्ती मिळाली असेच म्हणावे लागेल. तर संपूर्ण एप्रिल महिन्यातील २६ दिवसाचा एक्यूआय १०१-२०० पकंत आला होता. त्यामुळे मध्यम स्वरुपाच्या प्रदुषणाचा विळखा शहराला बसल्याचे जाणवले. त्यातल्या त्यात दिलासादायक बाब म्हणजे सदर महिन्यात एक्यूआय २०१-३००, ३०१- ४०० व ४०१-५०० परंत न गेल्याने बऱ्याच अंशी नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

**● प्रदुषणाची कारणे :**

थर्मल पॉवर प्लांट, उद्योग, घरगुती कोळसा ज्वलन, वाहनांची वाढती संख्या, त्यातून निघणारा धूर, धुळ, रस्त्यावरील धूळ, कचरा ज्वलन, बांधकाम आणि स्थानिक उद्योग इत्यादी अनेक कारणांमुळे अलीकडे सर्वत्र प्रदुषणात मोठी वाढ झाली असून त्यातून आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रत्येक शहरात अलीकडे विकासासाठी विविध बांधकाम, रस्ते बांधणे सुरु असते त्यातच वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यातून मोठ्या प्रमाणावर धूळ आणि धूर बाहेर पडते. बहुतेक शहरात सुध्दा अश्याच समस्या निर्माण होत असल्याने प्रदुषणात सतत वाढ होत असल्याचे प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारी वरुन लक्षात येते.

**● प्रदुषणामुळे रोगराईत वाढ :**

उन्हाळ्यात सुध्दा दरवर्षी प्रदुषण आढळते. सध्या उष्णतेमुळे आणि उष्ण वाऱ्यामुळे प्रदुषके वाहून जात आहेत त्यामुळे प्रदुषण थोडे कमी झाले आहे. अलीकडे प्रदुषणामुळे आरोग्य धोकादायक ठरत आहे. प्रदुषणामुळे आधीच श्वसनाच्या रोग असणाऱ्यांना हानिकारक असते. तसेच नव्याने श्वसनाचे रोग वाढू शकतात. दमा, ब्रॉकायटिस, टीबी, ह्दयरोग आणि मानसिक रोग वाढतात.

**● उपाययोजना :**

हे प्रदुषण नियंत्रण ठेवण्यासाठी वृक्षसंख्येत वाढ करणे, सायकलचा उपयोग वाढविणे, सार्वजनिक वाहने वापरणे, आणि विशेष म्हणजे बॅटरी वर चालणारी वाहने वापरणे आवश्यक आहे.

## भरती रखडल्याने युवकांवर बेरोजगारीचे संकट; गार्ड बोर्ड भरती तातडीने करा : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०५, चंद्रपूर :** भरती रखडल्याने जिल्ह्यातील अनेक पात्र युवकांवर बेरोजगारीचे संकट ओढवले असून, गार्ड बोर्ड भरती प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे. पावसाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या कामगारांच्या विविध प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर आज मंगळवारी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत त्यांनी हा मुद्दा ठामपणे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले.

पावसाळी अधिवेशनात उपस्थित केलेल्या कामगारांच्या विविध प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर मुंबई मंत्रालयात कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली आमदार किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत चंद्रपूर जिल्ह्यातील सुरक्षा रक्षक भरती, कंत्राटी कामगारांचे प्रश्न, गार्ड बोर्ड नोंदणी प्रक्रिया, कामगारांना घरे यांसह अनेक महत्त्वपूर्ण मुद्दे मांडण्यात आले. यावेळी सर्व विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

या बैठकीला कामगार विभागाचे उपसचिव स्वप्निल कापडणीस, सहआयुक्त शिरीन लोखंडे, अवर सचिव दिलीप वनिरे, चंद्रपूर सुरक्षा रक्षक मंडळाचे अध्यक्ष प्र. भि. कावळे आदींची उपस्थिती होती.यावेळी कामगारांना हक्काचे घर देण्याबाबत सकारात्मक पाऊल उचलण्यात यावे, असे आमदार जोरगेवार म्हणाले. पोलिस भरतीप्रमाणे गार्ड बोर्ड भरती केली जात आहे. हे कामगारांना मान्य नाही. त्यामुळे यातील अटी शिथिल करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. मंत्री महोदयांनीही याबाबत सकारात्मकता दाखवत लवकरच तसा जीआर काढण्याचे मान्य केले आहे. अनेक आस्थापने गार्ड बोर्ड नोंदणी करत नाहीत; अशा आस्थापनांवर कारवाई करण्याची मागणीही यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी केली.

यावेळी आ. जोरगेवार यांनी चंद्रपूर सुरक्षा रक्षक मंडळामार्फत विविध आस्थापनांना सुरक्षा रक्षक पुरविले जातात. मात्र, मागील काही काळापासून सुरक्षा रक्षकांची भरती प्रक्रिया रखडलेली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक पात्र व बेरोजगार तरुण रोजगारापासून वंचित राहिले असून, ते भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. तसेच अनेक आस्थापनांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. त्यामुळे ही भरती प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याची मागणी त्यांनी केली.

याशिवाय, मंडळामध्ये 'निरीक्षक' संवर्गातील दोन पदे रिक्त असल्याकडे लक्ष वेधत, भरती प्रक्रिया पारदर्शक व सुरळीत राबविण्यासाठी या पदांवर तातडीने योग्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. रिक्त पदांमुळे प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याचेही त्यांनी म्हटले.

कामगार विभागाने आतापर्यंत किती आस्थापनांची तपासणी केली, नोंदणीकृत नसलेल्या आस्थापनांवर काय कारवाई झाली, तसेच सुरक्षा रक्षकांच्या प्रलंबित नोंदणीची स्थिती काय आहे, याबाबत आ. जोरगेवार यांनी माहिती मागितली.

चंद्रपूरसारख्या औद्योगिक जिल्ह्यात ५० हजारांहून अधिक कंत्राटी कामगार कार्यरत असताना कामगार विभागात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. ही पदे तातडीने भरण्याबरोबरच कामगारांना किमान वेतन, पीएफ आणि ईएसआयसीच्या सुविधा मिळत आहेत का, याची प्रभावी तपासणी यंत्रणा उभी करण्याची मागणी त्यांनी केली.

प्रलंबित नोंदी पूर्ण करण्यासाठी विशेष नोंदणी शिबिर आयोजित करणे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कारवाईसाठी स्वतंत्र 'कृती दल' स्थापन करणे, नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी 'एक खिडकी' योजना सुरू करणे, तसेच नियमांचे पालन न करणाऱ्या उद्योगांवर परवान्यांशी संबंधित निर्बंध आणण्याची मागणीही यावेळी त्यांनी केली.

## 'आपले सरकार' पोर्टल बंद; महा-ई-सेवाचे कामकाज खोळंबले,
### राज्यभरातील विद्यार्थ्यांसह नागरिक संतप्त !

**दि.०५, बुलढाणा :** गेल्या पाच दिवसांपासून आपले सरकार पोर्टलमध्ये तांत्रिक दोष आल्याने राज्यभरातील महा-ई-सेवा केंद्रांचे ऑनलाइन कामकाज ठप्प झाले आहे. प्रतिज्ञापत्रे, शैक्षणिक व इतर दाखले मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. तर नागरिकांच्या प्रश्नांच्या भडीमारामुळे महा-ई सेवा केंद्र संचालक पेचात सापडले आहेत.

महा-ई-सेवा केंद्रांचे पोर्टल लॉगिन होत नसल्याने पुढील प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. परिणामी उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, अधिवास, नॉन-क्रिमिलेअर, ईडब्ल्यूएससह विविध दाखल्यांची ऑनलाइन प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यामुळे राज्यभरातील हजारो अर्ज प्रलंबित आहेत. दहावी व बारावीच्या परीक्षा संपल्यानंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, फार्मसी आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला वेग आला. आता बारावीचा निकालदेखील जाहीर झाला आहे. शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने विद्यार्थी व पालकांची गैरसोय होत आहे. विशेषतः दैनंदिन कामकाजासाठी लागणाऱ्या प्रतिज्ञापत्रांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. बँकिंग, न्यायालयीन, मालमत्ता, शैक्षणिक तसेच इतर अनेक कामांसाठी आवश्यक असलेली प्रतिज्ञापत्रे आपले सरकार पोर्टलची सेवा बंद असल्यामुळे मिळणे कठीण झाली आहे. पोर्टल बंद असल्याने आम्ही कोणतीही प्रक्रिया पूर्ण करू शकत नाही, असे उत्तर नागरिकांना ऐकावे लागते.

**डिजिटल सेवांप्रति नाराजी**

राज्य शासनाने डिजिटल सेवांचा मोठा गाजावाजा केला. ऑनलाइन सुविधा देण्याबाबत जनतेला आश्वस्त केले. मात्र, मुख्य पोर्टलच अचानक बंद पडले. ते आजपर्यंत सुरू झाले नाही. सेवा केंद्रांवर नागरिकांची गर्दी वाढत असली तरी त्यांना योग्य सेवा मिळत नसल्याने नाराजी वाढली आहे.

## ठाण्यात उभारणार देशातील पहिले 'रंग संग्रहालय'
### शहराला मिळणार जागतिक ओळख

**अक्षराज : विकास दळवी**




**दि.०५, ठाणे :** ठाणे शहराच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवात भर घालणारा एक महत्वाकांक्षी प्रकल्प लवकरच आकार घेण्याच्या मार्गावर आहे. देशातील पहिले 'रंग संग्रहालय' ठाण्यात उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला असून, यासोबतच शंभर वर्षे जुन्या बाजारपेठांच्या पुनर्विकासालाही गती मिळणार आहे.

भाजपचे ठाणे शहरातील आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांनी ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांची भेट घेऊन हा संयुक्त प्रस्ताव नुकताच सादर केला. भारत सरकारच्या 'अर्बन चॅलेंज फंड' अंतर्गत हा प्रकल्प राबविण्याचा मानस असून, आयुक्तांनी प्रस्ताव तातडीने केंद्र सरकारकडे पाठविण्याचे आश्वासन दिले आहे. प्रस्तावित 'रंग संग्रहालय' हे केवळ एक प्रदर्शन स्थळ नसून, विज्ञान, तत्वज्ञान, संस्कृती, आध्यात्म, कला, वास्तुकला आणि मानवी जीवनावर रंगांचा होणारा प्रभाव याचे बहुआयामी दर्शन घडवणारे आधुनिक केंद्र असेल.या प्रकल्पामुळे ठाणे शहर राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर ठळकपणे झळकण्याची शक्यता आहे. यासोबतच ठाण्यातील शंभर वर्षांहून अधिक जुनी बाजारपेठ आधुनिक सुविधांसह पुनर्विकसित करण्याचा प्रस्तावही सादर करण्यात आला आहे. या माध्यमातून शहराचा ऐतिहासिक वारसा जपत त्याला आधुनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न होणार आहे. हा प्रकल्प ठाण्याच्या सांस्कृतिक ओळखीला नवे आयाम देणारा ठरेल. रंगांच्या माध्यमातून ज्ञान, कला आणि विज्ञान यांचा अनोखा संगम नागरिकांना अनुभवता येईल, असे मत आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केले.ठाणेकर नागरिकांमध्ये या प्रकल्पाबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, असा संग्रहालय ठाण्यात उभारला जाणे ही अभिमानाची बाब आहे. यामुळे शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत.एकूणच, 'रंग संग्रहालय' आणि बाजारपेठ पुनर्विकास या दुहेरी प्रकल्पामुळे ठाणे शहर 'स्मार्ट' आणि 'सांस्कृतिक' शहर म्हणून नव्या उंचीवर पोहोचण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

अक्षराज



संपादकीय

## केळीदराचा प्रश्न मार्गी, पण...

मध्यपूर्वेतील संघर्षाची झळ संपूर्ण जगालाच बसत असली, तरी सर्वाधिक कंबरडे मोडले आहे ते भारताच्या कृषी क्षेत्राचे. समुद्रमार्गे होणारी निर्यात साखळी विस्कळित झाल्याने मागील दोन महिन्यांत नाशवंत शेतमालाचे हजारो कंटेनर वेगवेगळ्या बंदरांत अडकून आहेत, ज्यामुळे पंचवीस हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक नुकसान झाले आहे. निर्यातदार कंपन्या, व्यापारी, शेतकरी आदी सर्वच घटक या संकटाने होरपळले आहेत.

महाराष्ट्राच्या फळफळावळांची निर्यातसुद्धा होर्मुझ सामुद्रधुनीच्या कोंडीमुळे ठप्प आहे. परिणामी, एकट्या मार्चमध्ये राज्यातील उत्पादक आणि निर्यातदारांना एक हजार कोटी रुपयांना चुना लागला आहे. कांदा, द्राक्ष, कलिंगड, आंबा आदी पिकांपाठोपाठ केळी उत्पादकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. आजही केळीचे तीनशे कंटेनर अडकून आहेत, तर निर्यातीच्या प्रतीक्षेत शीतगृहांतील लाखो टन केळीचे अक्षरशः शिकरण झाले आहे.

युद्ध स्थितीमुळे मालवाहतूक खर्चातही प्रचंड वाढ झाली आहे. पूर्वी एका बावीस टन क्षमतेच्या कंटेनरचे भाडे दोन ते तीन लाख रुपये होते, ते आता आठ ते नऊ लाखांपर्यंत पोहोचले आहे. त्यातच स्थानिक बाजारांत केळीचे दर प्रचंड घसरल्याने उत्पादकांची अवस्था 'इकडे विहीर, तिकडे होमझ' अशी झाली आहे. दरांत चढ-उतार झाल्याने मधल्या काळात उत्पादन खर्च, मजुरी, वाहतूक आणि पॅकेजिंगचा खर्च निघणेही अवघड बनले. एवढ्या निराशाजनक वातावरणातही केळीबाबत एक सकारात्मक व दूरगामी परिणाम करणारी बाब मात्र घडली आहे. केळीचे दर यापुढे मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूरमध्ये नव्हे, तर जळगावमध्ये ठरविले जाणार आहेत, जी मागणी कित्येक वर्षांपासून केली जात होती. जळगाव, धुळे, नंदुरबारसह संपूर्ण राज्यात उत्पादित होणाऱ्या केळी उत्पादनाला या नव्या निर्णयाचा लाभ मिळू शकणार आहे. वास्तविक, केळी बाजारात अनेक वर्षांपासून बुऱ्हाणपूर बोर्डाची मक्तेदारी असल्याने महाराष्ट्रातील उत्पादकांची आर्थिक पिळवणूक सुरू होती.

केळी उत्पादनात आंध्र प्रदेशनंतर महाराष्ट्राचा देशात दुसरा क्रमांक लागत असला, तरी राज्याच्या या पिकाच्या एकूण उत्पादनात एकट्या जळगावचा वाटा निम्म्यापेक्षा अधिक असतो. असे असूनही केळीचे दर मात्र बुऱ्हाणपूर बाजार ठरवायचा आणि त्याच्या भरवशावर देशातील इतर बाजारपेठांतील भाव निश्चित व्हायचे. या बोर्डाच्या लहरीपणाचा फटका अनेकदा स्थानिक उत्पादकांना बसला. दर अचानक वाढविणे, कमी करणे, शुल्काची आकारणी अशा मनमानी कारभाराला सारेच वैतागले होते, ज्यापासून आता सुटका होऊ शकेल. राज्य सरकारच्या सूचनेनुसार या पिकाचे दर ठरविण्यासाठी जळगाव जिल्हा प्रशासनाने नऊ सदस्यीय विशेष समितीची स्थापना केली आहे. जिल्ह्यातील प्रमुख बाजार समित्यांचे सभापती, केळी उत्पादक, निर्यातदार, तज्ज्ञ प्रतिनिधी आणि संशोधन केंद्र प्रतिनिधींचा या समितीत समावेश असल्याने सर्वसमावेशक निर्णय घेतले जाणे अपेक्षित आहे. उत्पादनाची स्थानिक स्थिती, दर्जा आणि बाजारातील मागणीनुसार दर ठरणार आहेत. अर्थात, पुढे अनेक आव्हानेही वाढून ठेवली आहेत.

बुऱ्हाणपूरसह देशातील काही मंडईंतील व्यापाऱ्यांची लॉबी हे दर खरोखर स्वीकारेल का, हा प्रश्नच आहे. परंतु, ताज्या निर्णयामुळे केळी उत्पादकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. केळीदराचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर आखाती देशांसह नव्या बाजारांत निर्यात वाढविण्यासाठी धोरणात्मक बदलांची आस उत्पादक बाळगून आहेत.

शिपिंग खर्चावर नियंत्रण, शीतसाखळी व्यवस्थेचा विकास आणि शेतकरी व निर्यातदारांना संरक्षण देणारी धोरणे राबविणे हाच सद्यस्थितीचा सांगावा आहे. जगात केळीचे सर्वाधिक उत्पादन होऊनही भारत निर्यातीत मात्र तिसऱ्या-चौथ्या क्रमांकावर आहे. जागतिक बाजारात स्पर्धा करण्यासाठी लॉजिस्टिक आणि धोरणात्मक पाठबळसुद्धा महत्त्वाचे असते, हे लक्षात घेऊन धोरणे ठरायला हवीत. जेणेकरून नव्या बाजारपेठांना भारतीय केळीचा गोडवा चाखता येईल आणि उत्पादकांनाही चार पैसे मिळू शकतील.

**- संपत थेटे**

# खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून प्रवाशांची लूट !



राज्यात सर्वत्रच्या शालेय आणि महाविद्यालयीन परीक्षा संपून विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी लागली आहे शिवाय सध्या लगीन सराईसुद्धा सुरु आहे त्यामुळे मुंबई ठाणेसारख्या शहरांत राहणारे अनेक जण कुटुंबासह आपल्या गावी जाण्यासाठी निघाले आहेत. नेहमीच्या रेल्वेगाड्यांसह सुट्टीनिमित्त सोडण्यात आलेल्या विशेष रेल्वेगाड्याही दुथडी भरून वाहताना दिसत आहेत.

राज्यातील अनेक रेल्वे स्थानके प्रमुख शहरांत बांधण्यात आल्याने खेड्यापाड्यांत जाण्यासाठी बस किंवा खासगी वाहनाने जाण्याशिवाय पर्याय नसतो. एसटीचे जाळे राज्यभर विणलेले आहे. आज एसटी खेड्यापाड्यासह दुर्मिळ भागांतही पोहोचली आहे त्यामुळे या दिवसांत सर्वाधिक पसंती दिली जाते ती एसटीला. सुट्टीच्या दिवसांत महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ जादा गाड्या सोडते मात्र शहरांतील वाढलेल्या लोकसंख्येमुळे या जादा गाड्याही आधीच फुल्ल होऊन जातात. अशावेळी सामान्य माणूस वाट धरतो ती खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांची. एसटीप्रमाणे खासगी कंपन्यांच्या बसगाड्याही आज खेड्यापाड्यापर्यंत जात आहेत शिवाय यांमध्ये स्लीपर, पुश बॅक सीटर, एसी यांसारख्या लक्झरी सुविधा दिल्या गेल्याने कुटुंबासह लांबच्या आणि रात्रीच्या प्रवासासाठी त्या आरामदायी ठरतात. मात्र या खासगी बसगाड्यांचे तिकीटदर सुट्टीच्या दिवसांत दुप्पट ते तिप्पट झालेले असतात. अन्य कोणताच पर्याय शिल्लक नसल्याने प्रवासी नाईलाजास्तव या ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून चढ्या दराने तिकीट खरेदी करतात. शालेय सुट्या, सार्वजनिक सुट्या, सण-उत्सव म्हणजे या खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांचे सुगीचे दिवस असतात. रेल्वे डब्यात उभे राहून आणि चेंगरून प्रवास करून कुटुंबियांचे हाल करून घेण्यापेक्षा सामान्य प्रवासी या खासगी ट्रॅव्हल्ससाठी तिपटीने पैसे मोजतो. वर्षोनुवर्षे प्रवाशांची ही लूट अविरत सुरु आहे.

मात्र शासन त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करते. दरवर्षी अनेक सामाजिक संघटना या वाढीव तिकीटदराबाबत आवाज उठवतात, तक्रारी दाखल करतात, आंदोलने करतात मात्र राज्याचा परिवहन विभाग याकडे ढुंकूनही पाहत नाही. यांचे सीजन थोड्या थोडक्या दिवसांचे असते त्यामुळे ते संपले कि आंदोलन करणारे आपसूकच गप्प बसतील हे शासनालाही ठाऊक आहे त्यामुळे गेल्या कित्येक वर्षांपासून हे रहाटगाडे असेच सुरु आहे. या खासगी ट्रॅव्हल्स कंपन्यांवर सुट्टीच्या दिवसांत अधिक भार असल्याने अनेकदा गाड्यांच्या चालकांना पुरेशी झोप मिळत नाही ज्यामुळे अपघात घडतात, गाड्यांचे हेल्पर्स अनेकदा उर्मट असतात, गाड्यांचे एसी अनेकदा नीट काम करत नाहीत किंवा त्यातून पाणी गळत असते, अनेकदा प्रवाशांचे लगेज या गाड्यांच्या डिकीमधून चोरीला जाते या सर्वांच्या विरोधात त्यांच्या मालकांकडे तक्रार करूनही फारसा काही उपयोग होत नाही. चढ्या दरांत तिकीट खरेदी करून यांचा त्रासही सहन करावा लागतो. एरव्ही एसटीच्या दरात तिकीट देणाऱ्या या ट्रॅव्हल्स कंपन्या सुट्टीच्या दिवसांत अशा कोणत्या विशेष सुविधा देतात ज्याचे ते अधिक पैसे घेतात ? पोलिस प्रशासन या लुटीच्या संदर्भात काहीच कारवाई करण्यास तयार नसते, राज्य परिवहन विभागाला हे सर्व ठाऊक असूनही ते यामध्ये कोणताही हस्तक्षेप करण्यास तयार नसते.

ब्रॅंडेड किंवा पॅकिंग केलेल्या प्रत्येक पदार्थावर किंवा वस्तूवर एमआरपीचा टॅग लावणे आज बंधनकारक आहे आणि त्या एमआरपीपेक्षा एक रुपयाही अधिक घेतल्यास त्याबाबतची तक्रार ग्राहक संरक्षण विभागाकडे करता येते. सदर विभागसुद्धा तक्रारीची तत्परतेने दखल घेतो, अशाचप्रकारे खासगी प्रवासाचे दर सरकार का निश्चित करत नाही ? का या सर्व लुटीत प्रशासनातील अधिकाऱ्यांचे आणि मंत्र्यांचे काही साटेलोटे असते असा प्रश्न आज प्रत्येकाला पडत आहे. सरकार या लुटीविरोधात काहीच करणार नसेल तर सर्वसामान्य जनतेने जायचे तरी कोणाकडे ?

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

# 'बदलापूर ते नसरापुर' व्हाया नाशिक- पुणे - मुंबई



**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

ऐकिकडे राज्याचा स्थापना दिवस ऊत्साहाने साजरा होत असतांनाच याच पुणे जिल्हातील नसरापुर येथे घडलेल्या घटनेने महाराष्ट्राला हादरवून सोडले. एका विकृताने न कळत्या लहानग्या बालिकेवर अमानुष अत्याचार केला आणि ती ची हत्या करुन ती चे प्रेत शेणात लपविले ही केवळ विकृत मानसिकताच म्हणावी लागेल. विशेष म्हणजे हा नराधम हा गुन्हेगार प्रवृत्तीचा. याने या अगोदर दोन वेळा असे घृणास्पद प्रकार केले मात्र दुर्दैवाने त्याला शिक्षा झाली नाही त्याची परिणती म्हणजे त्याची विकृत मानसिकतेची ती बालिका बळी ठरली. या घटनेची तीव्र प्रतिक्रिया उमटणे हे सहाजिकच होते तशी ती ऊमटली त्यामुळे शासन-प्रशासन, पोलिसांनी तातडीने कारवाई केली, त्या नराधमाला अगोदरच ताब्यात घेतले आहे. आता याबाबतचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविला जाणार आहे, जेणेकरून या प्रकरणी निकाल लवकर लागेल आणि आरोपीला शिक्षा होईल.त्याला फाशी द्यावी ही समाजमनाची भावना आहे मात्र कायद्याच्या चौकटीत राहून तसे करता येत नाही, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावीच लागेल, मात्र त्याचा गुन्हा सिद्ध करण्याची जबाबदारी सरकारची, पोलीस यंत्रणेची आहे, त्यात कसुर राहु नये.

देशात काय किंवा राज्यात काय महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटना सातत्याने कुठे ना कुठे तरी घडत आहेत. २०२४ मधे बदलापूर येथील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर शाळेतीलच सफाई कामगाराने अत्याचाराच्या घटनां घडल्याचे ऊघड झाले आणि राज्यात एकच खळबळ माजली होती.पालकांचा अशाच आक्रोश दिसला होता, जनतेमधुन तीव्र प्रतिक्रिया उमटली होती.

अशी काही घटना घडली कि संबधित आरोपी, कोणाचे हितसंबंध कोणाशी, कोणाची पोहोच कुठपर्यंत आहे, लागेबांधे कोणाशी याचा विचार करुन पोलीस कारवाई ठरते, केली जाते, राजकीय पक्ष, नेते भुमिका घेतात. संशयित आरोपीला पकडले गेले, कालांतराने त्याचा एन्काऊंटर झाला आणि विषय मागे पडला, या घटनेतील एका आरोपीला तर स्विकृत नगरसेवक बनविण्यात आले मात्र गदारोळ माजला आणि तो निर्णय रद्द करण्यात आला. बदलापूर घटनेनंतर देखील अनेक घटना घडल्या, घडत आहेत,त्यातुन मुंबई, पुणे, नाशिक सारखी शहरे देखील सुटली नाहीत.

गेल्या काही वर्षांपासून देशात आणि राज्यात महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनां तसेच बेपत्ता होण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत, गुन्हेगारीमधे महाराष्ट्राचा वरचा नंबर लागतो हे पुरोगामी महाराष्ट्राला शोभनीय नाही याचा कारभारी, पहारेकरी, चौकीदार यांनी गांभीर्याने विचार करायला हवा. . अशोक घरात प्रकरणानंतर अनेक भोंदूबाबांच्या लीला ऊघड झाल्या अनेक भोंदूबाबा जेलमधे आहे. नेमके महाराष्ट्रात चाललंय तरी काय असा प्रश्न सामान्य जनतेला पडतो. हे राज्य जनतेचे आहे, कायद्याने चालणारे आहे तर तसे वातावरण आणि विश्वास निर्माण झाला पाहिजे आणि अशा घटनांना आळा घातला गेला पाहिजे.

दरवेळी अशी एखादी घटना घडली की चौकशीचा फार्स होतो, कारवाईचे इशारे दिले जातात, दोषींवर कारवाई होणारच असे छातीठोकपणे सांगितले जाते आणि कालांतराने विषय मागे पडुन अजुन एखादे नसरापुर घडते. निर्भयाकांडानंतर बालगुन्हेगारी कायद्यात बदल केले गेले. महाराष्ट्रात मविआ च्या काळात 'शक्ती' कायदा मंजूर केला गेला मात्र तो केंद्रात अडकला आहे डबल इंजिनचे सरकार असुनही या कायद्याबाबत ऊदासिनता दाखवली जात आहे. मग अशी कृत्ये करणाऱ्यांना अटकाव होणार कसा?

## खैरात

निवडणूकीचेज्वरात
फुकटमोफत खैरात
आकर्षित ते मतदार
चित्र पालटे रातोरात

उदारकर्णाचेअवतार
जाहीर उन्मादभरात
ऐकूनि ती आश्वासने
धडकी भरली ऊरात

निवडून आले साहेब
उत्साहे निघते बारात
सत्ता देवी अवतरली
सुखानंदेआलीदारात

आता आश्वासने सर्वं
उतरवायचीप्रत्यक्षात
तिजोरीत खडखडाट
कुणा न आले लक्षात

कशीकरायची पूर्तता
चिंता ग्रासली वक्षात
अशक्यकराया शक्य
सामसूम होई कक्षात

शब्द राखायचा कसा
चलबिचलघडे पक्षात
नाहीम्हणायचे रे कसे
अडचण रे अपरोक्षात

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज !

आज ६ मे, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १०४ वि पुण्यतिथी. आजच्याच दिवशी १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर (करवीर) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नामकरण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मिळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्मदिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. पुण्यतिथीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खारघर मध्ये नवतरुण वकिलाचा डंपरच्या धडकेत मृत्यू



**अक्षराज : दत्तात्रय शिंदे**

**दि.०४, पनवेल (खारघर) :** खारघर से.१२ येथे वास्तव्यास असणारे २८ वर्षीय वकील महेश अशोक लोहार दिनांक ०३ मे २०२६ रोजी आपले कामकाज आटपून आपल्या मित्रांसमवेत दुचाकीवरून घरी परतत असताना राडारोडा वाहून नेणाऱ्या भरधाव डंपरने महेश यांच्या दुचाकीला मागिल बाजूस जोरदार धडक दिली. आणि ती धडक एवढी भीषण होती की, महेश यांच्या अंगावरून डंपर गेला व ते जागीच ठार झाले तर डंपरच्या धडकेत त्यांचा मित्र दुर उडवला गेला. या सर्व घटनेची माहिती मिळताच सर्व मित्रपरिवार स्थानिक नागरिक आणि मृतांच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेत गर्दी करत तीव्र संताप व्यक्त केला. काही वेळातच त्यांनी रस्त्यावर ठिय्या देत रास्तारोको सुरू केला. यामुळे खारघरमधील उत्सव चौक ते अग्निशमन दलापर्यंत वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

तसेच या सर्व घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांच्यासह वाहतूक शाखेचे अधिकारी मुजावर व पोलीस कर्मचारी दाखल झाले. त्यांनी संतप्त जमावाची समजूत काढत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले अखेर सायं.७.३० वाजता सर्व वाहतूक कोंडी सुरळीत करण्यात आली.

## तब्बल ३६ वर्षांनी पुन्हा भरली ‘शाळा’; आठवणींना उजाळा देत मित्र-मैत्रिणींचा उत्स्फूर्त मेळावा



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०४, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील सापोली येथील फार्म हाऊस येथे कै, पु.न.गोडसे, विद्यामंदिर वरसई शाळेच्या १९८९-९० सालच्या दहावी बॅचचा स्नेहमेळावा तब्बल ३६ वर्षांनंतर अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडला. दीर्घ कालावधीनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या शालेय आठवणींना उजाळा देत ‘त्या’ दिवसांना पुन्हा एकदा अनुभवले.कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर परिचय सत्र, संवाद आणि आठवणींचा फेरफटका यामध्ये सर्वजण रंगून गेले. फळ्यावरचा खडू, शिक्षकांचा शिस्तीचा धाक, मधल्या सुट्टीतील डबा, कट्ट्यावरच्या गप्पा आणि वर्गातील खोडकर प्रसंग यांची उजळणी करताना अनेकांच्या चेहऱ्यावर आनंदासोबत भावूकतेचे ही भाव दिसून आले. काहींच्या केसांत पांढरेपणा आला असला तरी मनातील मैत्रीचा उत्साह मात्र तितकाच ताजा असल्याचे या मेळाव्यातून स्पष्ट झाले.या स्नेहमेळाव्याला विविध शहरांतून व गावांतून मित्र-मैत्रिणींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. काही जणांनी शेकडो किलोमीटरचा प्रवास करून कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. एकमेकांची विचारपूस, जुने फोटो पाहणे, आठवणींना उजाळा देणे आणि हसत-खेळत गप्पांचा फड रंगवणे यामुळे वातावरण प्रसन्न झाले होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी पडद्यामागे काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. नियोजन, समन्वय आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक बाबीत योगदान देणाऱ्या मित्रांनी मोठी मेहनत घेतली. वेळ काढून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी झटलेल्या सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी भविष्यातही संपर्कात राहण्याचा व अशा स्नेहमेळाव्याचे नियमित आयोजन करण्याचा निर्धार व्यक्त केला. ‘मैत्रीचे हे नाते काळाच्या ओघात अधिक घट्ट होत जाते’ याची प्रचिती या कार्यक्रमातून आली. कार्यक्रम शेवटी आनंदी व भावनिक वातावरणात संपन्न झाला. उपस्थितांनी एकमेकांना पुन्हा भेटण्याचे आश्वासन देत निरोप घेतला.

## कौन बनेगा महागायक स्पर्धेत प्रकाश धानकेंची दमदार कामगिरी




**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.०५, शहापूर (ठाणे) :** अखिल भारतीय शिक्षक साहित्य-कला-क्रीडा मंडळातर्फे, राज्याध्यक्ष नटराजजी मोरे यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित कौन बनेगा महागायक या राज्यस्तरीय कराओके गीतगायन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नागपूर, मराठवाडा, कोकण, नाशिक, पुणे आणि अमरावती या सहा विभागांतील विजेते स्पर्धकांनी आपल्या विभागाचे प्रतिनिधित्व करत रंगतदार सादरीकरण केले.

अत्यंत चुरशीच्या आणि दर्जेदार झालेल्या या स्पर्धेत मराठवाडा विभागाचे मुन्ना थोरात सर यांनी प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले. कोकण विभागाचे प्रकाश धानके सर यांनी उत्कृष्ट गायनाने द्वितीय क्रमांक पटकावत कोकणचा झेंडा उंचावला, तर नाशिक विभागाचे संतोषजी मिरघे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. सर्वोत्कृष्ट विजेता म्हणून रविंद्रजी तरे यांची निवड झाली, तर नागपूर विभागाचे विकास पुरेल्लीवार यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले.

या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. प्राचार्य महेंद्र भिवंडीकर, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार रणजीत वर्मा, संगीत दिग्दर्शक शाम क्षिरसागर, अभिनेत्री स्नेहा केसरकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून स्पर्धकांचे कौतुक केले आणि नटराजजी मोरे यांना सेवापूर्तीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्याताई शिर्के-बाळदकर यांनी ओघवत्या शैलीत केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन राज्य सचिव हर्षल साबळे मॅडम यांच्या नेतृत्वाखाली मंडळाच्या परिवाराने यशस्वीरीत्या पार पाडले.

# निफाड तालुक्यात ‘शिवरस्ते’ मोजणीचा ऐतिहासिक उच्चांक

## एकाच दिवसात ७ रस्त्यांचे मोजमाप पूर्ण



निफाड तालुक्यात एकाच दिवसात सात रस्त्यांची मोजणी होणे हा एक उच्चांक आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. या मोहिमेत सहभागी सर्व अधिकारी, कर्मचारी आणि शेतकऱ्यांचे आम्ही आभार मानतो.

**– विजय दरेकर (सदस्य, शिव पाणंद शेत रस्ते चळवळ कृती समिती)**

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** निफाड निफाड तालुक्यात प्रशासकीय गतिमानता आणि शेतकरी चळवळीच्या समन्वयातून आज एक नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. महसूल आणि भूमी अभिलेख विभागाच्या संयुक्त विद्यमाने एकाच दिवसात तब्बल ७ गाव नकाशांवरील शिवरस्त्यांची मोजणी पूर्ण करण्यात आली असून, यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागणार आहेत.

उपविभागीय अधिकारी डॉ. मंगरुळे, तहसीलदार नाईकवाडे आणि भूमी अभिलेख उपअधीक्षक भाबड यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबवण्यात आली. ’महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेत रस्ते चळवळ कृती समिती’च्या पाठपुराव्याला या मोहिमेमुळे मोठे यश मिळाले आहे.

या यशस्वी मोहिमेबद्दल कृती समितीचे योगेश अडसरे, सुरेश वाटपाडे, दशरथ शिंदे, नवनाथ सालगुडे, गणेश जाधव आदींनी प्रशासनाचे कौतुक केले आहे. या मोहिमेमुळे तालुक्यातील इतरही प्रलंबित रस्त्यांच्या कामांना गती मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

या मोहिमेत मंडळ अधिकारी घाडगे, भास्कर शिरस्तेदार, आणि विविध गावांचे ग्राम महसूल अधिकारी, पंचायत अधिकारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. मोजणीच्या वेळी कृष्णा मुरकुटे, सुभाष जाधव, विष्णू पुंड, भाऊसाहेब अहिरे यांसह अनेक लगतचे शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मोजणी झालेले प्रमुख रस्ते व ठिकाणे :-**

१) म्हाळसाकोरे येथील भेंडाळी-वाळके वस्ती व ढोबळे वस्ती रस्त्याची मोजणी निमतानदार शशिकांत बैरागी व कुलकर्णी (ग्राम महसूल अधिकारी) यांच्या उपस्थितीत झाली.

२) धारणगाव वीर - धारणगाव खडक : या शिवरस्त्यासाठी प्रतीक हजारे व गायकवाड मॅडम यांनी पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने मोजणी पूर्ण केली.

३) उंबरखेड - पिंपळगाव: भुकरमापक शैलेशसिंग राजपूत व मंडळ अधिकारी बोडके साहेब यांच्या उपस्थितीत या रस्त्याचे मोजमाप झाले.

४) भुसे - करजगाव: येथे अभिलेखापाल प्रदीप कुटे यांनी रस्त्याची एक बाजू मोजून पूर्ण केली.

५) दारणा सांगवी - शिंपी टाकळी: रुपेश पाटील (भुकरमापक) यांनी या मार्गाची मोजणी यशस्वीरीत्या पूर्ण केली.

६) दत्त मंदिर (दारणा सांगवी) ते डोंगरवाडी हिंगणवेढे: तनय विसपुते यांनी या रस्त्याच्या अर्ध्या भागाची मोजणी पूर्ण केली.

७) दारणा सांगवी (म्हसोबा वाट ते सावळीवाट) : या रस्त्यासाठी कांतीलाल बोडके यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भाजपा चंद्रपूर महानगरच्या वतीने चंद्रपूरात भाजपचा विजय जल्लोष संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** आसाम, पश्चिम बंगाल व पुडुचेरी येथे भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या ऐतिहासिक विजयाच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर शहरात आयोजित जल्लोष कार्यक्रम उत्साहात पार पडला. भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगरच्या वतीने गांधी चौक येथे हा कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.


यावेळी भारतीय जनता पक्षाचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रघुविर अहिर, महामंत्री मनोज पाल, श्याम कनकम, नामदेव डाहुले, सविता दंढारे, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, तुषार सोम, दशरथ सिंग ठाकूर, बलराम डोडाणी, सुधीर कारंगल, अमोल शेंडे, महिला महामंत्री सायली येरणे, युवा मोर्चा अध्यक्ष मयूर वाढई, अनुसूचित जमाती अध्यक्ष तथा नगरसेवक जितेश कुळमेथे, गटनेता शेखर शेट्टी, नगरसेवक संजय कंचर्लावार, भालचंद्र दानव, नितेश गवळी, नगरसेविका अनुजा तायडे, आशा देशमूख, सारिका संदुरकर, मजुशी कासनगोट्टूवार, अनुसूचित जाती अध्यक्ष विमलताई कातकर, विनोद शेडकी, मंडळ अध्यक्ष स्वप्निल डुकरे अल्पसंख्यांक अध्यक्ष राशीद हुसेन, कौसर खान, सुजाता कापसे, कामगार झोपडपट्टी अध्यक्ष रामकुमार अकापल्लीवार, सिनेट सदस्य निलेश बेलखेडे, प्रलश मशाखत्री, प्रमोद शास्त्रकार, प्रविण गिलबिले, सतीश तायडे, भाजप नेते शिरीष गोगलवार, सागर बोरेवार, भाग्येश्री हांडे, सुमित बेले, प्रतिक शिवणकर, कार्तीक बोरेवार, राकेश नाकाडे, बबलु मेश्राम, ईश्वर वाघमारे, रेषमा पांडे विनोद पेंडलीवार, सुरेंद्र अंचल, आदींची उपस्थिती होती.

यावेळी कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतीषबाजी करत तसेच लड्डू वाटप करून कार्यकर्ते व समर्थकांनी विजयाचा आनंद व्यक्त केला. संपूर्ण परिसर घोषणाबाजीने दुमदुमून गेला होता.

पक्षाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल एकमेकांचे अभिनंदन करत सर्वांनी आनंदोत्सव साजरा केला. एकूणच, भारतीय जनता पार्टीच्या विजयाचा हा जल्लोष चंद्रपूरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

त्यानंतर भारतीय जनता पार्टीच्या महानगर कार्यालयात घोषणाबाजी आणि फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. कार्यक्रमाला शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यभर उन्हाचा पारा वाढत असताना ठाण्यात पुन्हा पाणीबाणी




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, ठाणे :** या वर्षी राज्यभर उन्हाचा पारा वाढत असताना ठाणेकरांना मात्र दिवसेंदिवस पाण्याच्या समस्या भेडसावत आहेत.मागील काही दिवसांपासून शहरात पाणीकपात केल्यानंतर आता दर आठवड्याला देखील अनेक भागांतील पाणीपुरवठा खंडीत होत असल्यामुळे ठाणेकरांना पाणी टंचाईच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. आता गुरूवार ते शुक्रवार शहरातील अनेक भागांत २४ तास पाणीपुरवठा बंद असणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्यात येणाऱ्या देखभाल व दुरुस्तीच्या कामामुळे ठाणे शहरातील काही भागांमध्ये २४ तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे.गुरुवार दि.७ मे २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजल्यापासून ते शुक्रवार दि.८ मे २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत हा शटडाऊन लागू राहणार आहे.

जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रातील जलाशय (HSR) येथे बारवी गुरुत्ववाहिनी क्रमांक १, २ व ३ वर उन्नतीकरण करण्यासह तातडीच्या देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येत असल्यामुळे हा पाणीपुरवठा खंडीत होणार आहे.

दरम्यान या कालावधीत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ व ३१) मधील काही भाग वगळता), कळवा या प्रभाग समित्यांतील सर्व भागांमध्ये पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. तसेच वागळे प्रभाग समितीतील रुपादेवी पाडा, किसननगर क्र. २, नेहरूनगर आणि मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव या भागांचा पाणीपुरवठा २४ तासांसाठी बंद राहणार आहे.

यानंतर पाणीपुरवठा परत सुरळीत झाल्यावरही नागरिकांना काही दिलासा मिळणार नाही. पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक तेवढे पाणी साठवून ठेवावे व पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन ठाणे महानगरपालिके मार्फत करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन देखील प्रशासनाने केले आहे. याशिवाय मिरा भाईंदर मध्येही ७ मे, गुरूवारी, पाणी पुरवठा बंद राहणार आहे. एल निनो च्या प्रभावामुळे यंदा पावसाळा लांबणीवर असून पाऊस कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने पाण्याचे नियोजन करण्यासाठी पाणीकपात लागू केली आहे. त्यानुसार एमआयडीसीकडून शहरात होणारा पाणीपुरवठा या मे महिन्यात दोन वेळा बंद राहणार आहे. ७ मे रोजी आणि २१ मे रोजी शहरातील पाणीपुरवठा २४ तासांसाठी पूर्णपणे बंद राहील.

७ मे, गुरूवारी दुपारी १२ ते ८ मे रोजी, शुक्रवारी दुपारी १२ वाजेपर्यंत शहरातील पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. दरम्यान, २१ मे रोजी, गुरूवारी दुपारी १२ ते २२ मे रोजी, शुक्रवारी दुपारी १२ पर्यंत पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

# उष्माघातापासून काळजी घेण्याचे नवी मुंबईकरांना आवाहन

**अक्षराज : जे. के. पोळ**


**दि.०५, नवी मुंबई :** मार्च महिन्यापासून राज्यातील अनेक भागात तापमान वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. हिट व्हेव किंवा उष्णेतेची लाट ही एक मूक आपत्ती (सायलेंट डिझास्टर) आहे. साधारणपणे एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ डिग्री सेल्सियसने जास्त असेल किंवा सलग दोन दिवसांसाठी ४५ डिग्री सेल्सियसपेक्षा जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात. यामध्ये माणसांसोबतच पक्षी, प्राणी, वनस्पती यांची होणारी हानी मोठी आहे. साधारणपणे मार्च ते जून या मान्सून पूर्वकाळात या उष्णतेच्या लाटा येताना दिसतात.

**उन्हापासून सुरक्षित राहण्यासाठी नागरिकांनी खालील गोष्टींचे पालन करावे.**

दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर जाणे टाळा. पांढरे, सौम्य रंगाचे सैलसर कपडे वापरा, डोक्यावर टोपी घाला, किंवा छत्रीचा वापर करा.

आपली बाहेरील कामे सकाळी १० च्या आत किंवा संध्याकाळी ४ नंतर करा.

टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्ष, अननस, काकडी, कोशिंबीर इ. उच्च पाण्याचे प्रमाण असलेली हंगामी फळे व



भाज्या खा.

उन्हात शारीरिक कष्टाची कामे टाळा.

पुरेसे पाणी प्या. ताक, लिंबू पाणी, नारळ पाणी असे द्रव पदार्थ घ्या. प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवा.

लहान मुले, गरोदर माता,आणि वृद्ध नागरिक संवेदनशील असल्याने त्यांची जास्त काळजी घ्या.

चप्पल न घालता / अनवाणी उन्हात चालणे टाळा.

लहान मुलांना आणि पाळीव प्राण्यांना आत ठेवून गाडी बंद करणे टाळा.

सामुहिक मेळावा/ क्रीडा कार्यक्रम या ठिकाणी पाण्याची सोय असेल, थेट सूर्यप्रकाशाशी संपर्क नसेल याची खबरदारी घ्या.

आपल्या दैनंदिन जीवन शैलीत साधे - सोपे, छोटे बदल करून नागरिकांनी काही आवश्यक गोष्टींचे पालन करावे आणि उष्माघात संदर्भात लक्षणे आढळून आल्यास आपल्या जवळच्या महानगरपालिका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालयातून उपचार घ्यावेत, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## त्र्यंबकेश्वरमध्ये कुंभमेळ्याचा बिगुल; कुशावर्त तीर्थावर मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजस्तंभाचा शिलान्यास

### १० कोटी भाविकांच्या नियोजनासाठी नाशिक ते त्र्यंबक दरम्यान नवीन 'स्नान कुंड' उभारण्याचा प्रस्ताव

> कुंभमेळा हा साधू आणि भाविकांचा उत्सव आहे. शासन केवळ सोयी-सुविधा पुरवणारा माध्यम आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि उत्तम सुविधांसाठी सरकार कटिबद्ध आहे.
> **- गिरीश महाजन, कुंभमेळा मंत्री**



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०४, विंचूर (नाशिक) :** त्र्यंबकेश्वर आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा श्रीगणेशा श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात झाला. कुंभमेळ्यातील शाही स्नानासाठी जगप्रसिद्ध असलेल्या ऐतिहासिक कुशावर्त तीर्थावर ३१ फूट उंच भव्य ध्वजस्तंभाचा शिलान्यास सोहळा रविवारी मोठ्या थाटात संपन्न झाला. या धार्मिक विधीने आगामी कुंभमेळ्याच्या नियोजनाला अधिकृतपणे सुरुवात झाल्याचे मानले जात आहे.

**प्रमुख मान्यवरांची उपस्थिती**

अयोध्या रामजन्मभूमी तीर्थक्षेत्राचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंदगिरीजी महाराज, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत रवींद्र पुरीजी महाराज आणि महामंत्री महंत हरी गिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते हा शिलान्यास करण्यात आला. यावेळी कुंभमेळा प्रशासन आणि विविध आखाड्यांचे साधू-महंत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अमृतमंथन संकल्पनेवर आधारित स्तंभ**

परंपरेनुसार कुशावर्तावर ज्या ठिकाणी भगवान त्र्यंबकेश्वराच्या पालखीतील मुखवट्याची पूजा होते, त्याच जागेजवळ पश्चिमेला हा ३१ फुटी ध्वजस्तंभ उभारला जाणार आहे. या स्तंभाचे वैशिष्ट्य म्हणजे हा पौराणिक 'अमृतमंथन' कथेच्या संकल्पनेवर आधारित असेल. यावर धन्वंतरी, कामधेनु, ऐरावत, कल्पवृक्ष, लक्ष्मी आणि पाचजन्य शंख यांसारखी १४ रत्नांची बोधचिन्हे कोरली जाणार आहेत.

**गर्दीच्या नियोजनासाठी नवीन कुंडांची निर्मिती**

कार्यक्रमानंतर आखाडा परिषदेचे महामंत्री हरी गिरीजी महाराज आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यात कुंभमेळ्याच्या नियोजनाबाबत महत्त्वाची चर्चा झाली.

**विक्रमी उपस्थिती :** आगामी कुंभमेळ्यात सुमारे १० कोटी भाविक येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

विस्तारीकरण: कुशावर्त तीर्थाची जागा मर्यादित असल्याने, भाविकांच्या सुविधेसाठी त्र्यंबकेश्वरमधील अन्य तलाव आणि गोदावरी नदीच्या पात्रात नवीन 'स्नान कुंडांची' निर्मिती करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे.

नवा प्रस्ताव: नाशिक ते त्र्यंबकेश्वर या ४० किलोमीटरच्या गोदावरी प्रवाहावर ठिकठिकाणी कुंड उभारावीत, जेणेकरून गर्दी विभागली जाईल आणि सर्वांना सुरक्षितपणे स्नान करता येईल, असा प्रस्ताव आखाडा परिषदेने मांडला.

**प्रशासकीय उपस्थिती :**

या सोहळ्याला विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, पोलीस अधीक्षक स्वामी, त्र्यंबकच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार यांच्यासह पुरोहित संघ आणि हजारो भाविक उपस्थित होते.

## पुलाचा अंदाज न आल्याने कार पलटी; तरुण व्यावसायिकाचा दुर्दैवी मृत्यू




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, परभणी :** जिल्ह्यातील गंगाखेड शहराजवळ रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका तरुण व्यावसायिकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसर हादरला आहे. गंगाखेड-लोहा राज्य महामार्गावर मालेवाडी पाटी जवळ हा हृदयद्रावक अपघात घडला.

या अपघातात गंगाखेड येथील सुप्रसिद्ध व्यावसायिक तथा 'धीरज मोटर्स'चे मालक धीरज बालासाहेब जगलपुरे (वय ३८) यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अचानक निधनामुळे शहरात व व्यापारी वर्गात हळहळ व्यक्त होत असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.सविस्तर माहितीनुसार, धीरज जगलपुरे हे रविवारी रात्री उशिरा स्वतःची क्रेटा कार (चक ४३ इध ३५५५) घेऊन गंगाखेडहून नांदेडकडे जात होते. रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास ते मालेवाडी पाटी परिसरात पोहोचले असता, तेथे सुरू असलेल्या पुलाच्या अपूर्ण कामाचा आणि अचानक आलेल्या वळणाचा त्यांना अंदाज आला नाही. अंधार आणि वेग यामुळे कारवरील नियंत्रण सुटून गाडी रस्त्याच्या कडेला जाऊन भीषणरीत्या पलटी झाली.अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी गाडीत अडकलेल्या धीरज जगलपुरे यांना बाहेर काढून तातडीने गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

सोमवारी सकाळी आवश्यक वैद्यकीय प्रक्रिया व शवविच्छेदन पूर्ण करून त्यांचे पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन लहान मुले व भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण गंगाखेड शहर शोकमग्न झाले आहे.

**सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!**

महामार्गावर सुरू असलेल्या अपूर्ण कामांमुळे व योग्य ती सूचना, प्रकाशयोजना नसल्याने अशा अपघातांची शक्यता वाढत आहे. संबंधित ठिकाणी इशारा फलक, रिफ्लेक्टर व पुरेशी लाईट व्यवस्था करणे अत्यावश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## एमजीएम हॉस्पिटल समोरील सर्व अतिक्रमणे जमीनदोस्त

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, कळंबोली (पनवेल) :** कळंबोली जंक्शन सुधारणा प्रकल्प अंतर्गत मुंबईच्या दिशेने होणारी वाहतूक सुरळीत होण्यासाठी एमजीएम हॉस्पीटल समोरील कॉरीडर उपायोगात आणण्यासाठी, पनवेल महानगरपालिका व सिडको प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक ०५ मे रोजी मंगळवारी मोठी तोडक कारवाई करून हा परिसर अतिक्रमण मुक्त करण्यात आला.

या संयुक्तिक कारवाईवेळी पनवेल महानगरपालिका, सिडको प्रशासन, पोलिस प्रशासन यांचे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ उपस्थित होते. जेसीबीच्या साह्याने करण्यात आलेल्या या तोडक कारवाईत एमजीएम रूग्णालयासमोरील वर्षानुवर्षे उभारलेली पक्की अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली.

आयुक्त मंगेश चितळे व अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईवेळी कारवाई सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ.रूपाली माने, अधिक्षक दशरथ भंडारी, उमेश मडवी, सिडको अधिकारी रावसाहेब देवकर आणि टीम, तसेच पोलीस कर्मचारी व पनवेल महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## पाणीटंचाईवर वेदिका पाटील आक्रमक : अधिकाऱ्यांसोबत बैठकीत ७ कलमी तोडगा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, दिवा, (ठाणे) :** ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २९ मधील नागरिकांना गेल्या अनेक महिन्यांपासून भेडसावणाऱ्या पाणीटंचाई व अनियमित पाणीपुरवठ्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी काल, सोमवार दि. ४ मे २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजता ठाणे महानगरपालिका मुख्य कार्यालय ठाणे येथे पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस ठाणे मनपाच्या पाणीपुरवठा विभागाचे उपनगर अभियंता पवार, दिवा प्रभाग समितीचे कार्यकारी अभियंता साळुंखे व मुंब्रा प्रभाग समितीचे कार्यकारी अभियंता कुलकर्णी उपस्थित होते. नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनी प्रभागातील पाणी समस्यांबाबत आक्रमक भूमिका घेत अधिकाऱ्यांसमोर नागरिकांच्या व्यथा मांडल्या. बैठकीत सविस्तर चर्चेअंती प्रभागातील पाणी प्रश्नावर ७ कलमी तोडगा काढण्यात आला असून, लवकरच नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

**बैठकीत झालेले ७ महत्त्वाचे निर्णय :**

**१. भोलेनाथ नगर, खार्डी, निर्मल नगरीत**

**पाण्याचा दाब वाढवणार :** या परिसरात अत्यंत अपुरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक हैराण आहेत. पाण्याचा दाब वाढवण्यासाठी तातडीने तांत्रिक उपाययोजना करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांनी दिले.



**२. पाणीपुरवठ्याची वेळ वाढवण्याची मागणी :** दिवसेंदिवस पाणीपुरवठ्याची वेळ कमी होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. ही वेळ वाढवून देण्याची मागणी नगरसेविका पाटील यांनी लावून धरली असून, प्रशासनाने यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

**३. नवीन पाईपलाईनच्या कामाला गती :** कल्याणफाटा ते वाय जंक्शन व खिडकाळी ते कल्याणफाटा या नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा आढावा घेण्यात आला. कामातील अडचणी दूर करून काम वेगाने पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी पूर्ण सहकार्याची हमी दिली.

**४. पडले, खार्डी येथे नवीन पाण्याची टाकी :** या भागातील कायमस्वरूपी पाणीटंचाई दूर करण्यासाठी नवीन पाणी साठवण टाकी उभारण्याचा प्रस्ताव तातडीने तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ही टाकी झाल्यास संपूर्ण परिसराला मोठा दिलासा मिळेल.

**५. MIDC कडून पाणी पुरवठ्यात वाढ :** सध्या चखूउ कडून मिळणाऱ्या पाण्याच्या कोट्यात वाढ करून प्रभागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत चर्चा झाली. यासाठी तातडीने पाठपुरावा करण्याचे ठरले.

**६. पाईपलाईन गळतीवर तातडीने कारवाई :** प्रभागातील विविध भागांमध्ये पाणी पाईपलाईनला गळती लागून हजारो लिटर पाणी वाया जात आहे. अशा सर्व ठिकाणी तातडीने दुरुस्ती करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले.

**७. खिडकाळी टाकीचे काम उद्यापासून सुरू :** अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या खिडकाळी येथील पाण्याच्या टाकी परिसराची स्वच्छता करून संरक्षण भिंत बांधण्याचे काम उद्या, सोमवार दि. ५ मे पासून सुरू करण्यात येईल, असा लेखी विश्वास अधिकाऱ्यांनी दिला.बैठकीनंतर नगरसेविका वेदिका साहिल पाटील म्हणाल्या, प्रभागातील प्रत्येक घरात सुरळीत, स्वच्छ व पुरेसा पाणीपुरवठा व्हावा यासाठी मी प्रशासनाच्या मागे लागून राहणार.

आजच्या बैठकीत प्रत्येक मुद्द्यावर ठोस आश्वासन मिळाले असून, येत्या काही दिवसांत नागरिकांना त्याचे परिणाम दिसतील. दरम्यान, पाण्याच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर नगरसेविकांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरल्याने व तातडीने बैठक घेऊन ७ कलमी तोडगा काढल्याने प्रभाग २९ मधील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## थोडक्यात

### श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, बुलडाणा :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बुलढाणा येथे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून महाविद्यालयाच्या विज्ञान विभाग व HSVC विभाग दोन्हीचा १०० टक्के निकाल लागून उज्वल निकालाची परंपरा या वर्षी ही कायम ठेवली आहे. विज्ञान व HSVC विभागातील गुणवंत कौतुकास पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य पी.एस.कावरे, प्रभारी पर्यवेक्षक नितीनकुमार ढोमणे, विभागप्रमुख योगेश भोंडे, HSVC विभागप्रमुख पी.व्ही.वाघ, प्रमुख उपस्थिती मध्ये पालकप्रतिनिधी शुभांगीताई भोंडे, संध्या पाटील मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीनकुमार ढोमणे यांनी केले. सदर सत्कार समारंभाच्या अनुषंगाने शुभांगीताई भोंडे व श्रीखंडे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी इयत्ता १२ विच्या परीक्षेत प्रथम आलेली कु. अनुष्का बऱ्हाटे, द्वितीय कु. अन्वेषा घनोकर व तृतीय कु. श्रावणी पाठक तसेच प्राविण्य श्रेणीमध्ये आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य कावरे सर यांनी विद्यार्थ्यांना मनात जिद्द, चिकाटी व स्वतःची कार्यक्षमता ओळखून प्रयत्न करावे व प्रगती करून कुटुंबाचे स्वप्न साकार करावे असे बहुमोल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे फलक लेखन ए. व्ही. साळोक यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कु. दिपाली मते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. डी. के. पाटील, कु. तायडे, कु. इंगळे, कु. वाघ, कु. मते, श्री. बनसोडे, श्री. मजगे, मधुकर पाटील, श्री. तिडके यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग उपस्थित होते.

### राष्ट्रीय मार्ग १२४ फरदापुर ते नागत रस्त्याच्या कामामुळे उडणाऱ्या धुळीने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**पाणी फवारणी व सुरक्षेची उपाययोजना करण्याची मागणी**



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सध्या सुरू असलेल्या नागद सोयगाव फर्दापूर मार्ग क्रमांक १२४ रस्त्याच्या कामामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. कामाच्या ठिकाणी योग्य ती खबरदारी न घेतल्यामुळे वाहनांच्या हालचालींसोबत धुळीचे ढग हवेत पसरत आहेत. यावेळी घोसला गावातील माजी पोलीस कर्मचारी उत्तम चिंतामण बावस्कर व स्थानिक नागरिकांच्या मते, सकाळपासून संध्याकाळपर्यंत धुळीमुळे श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ, खोकला आणि एलर्जीचे प्रमाण वाढले आहे. विशेषतःलहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्याच्या कामादरम्यान पाणी फवारणी न केल्याने परिस्थिती अधिक गंभीर होत आहे.नियमांनुसार बांधकाम स्थळी धूळ नियंत्रणासाठी नियमित पाणी टाकणे,तसेच सुरक्षेची उपाययोजना करणे आवश्यक असताना संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी नियमित पाणी फवारणी करावी, तसेच धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाय त्वरित राबवावेत,अशी मागणी जोर धरत आहे. सबंधीत संबंधित ठेकेदाराने तात्काळ उपायोजना न केल्यास जन आंदोलन छेडण्याचा इशारा माजी पोलीस कर्मचारी उत्तम बावस्कर व नागरिकांनी दिलेला आहे.

### ठाण्याच्या किमया बोआची ऐतिहासिक कामगिरी बारावीत १०० टक्के गुणांसह देशात प्रथम



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, ठाणे :** ठाणे शहरासाठी अभिमानास्पद क्षण! श्रीमती सुलोचनादेवी सिंघानिया स्कूलची विद्यार्थिनी कुमारी किमया बोआ हिने इयत्ता १२ वीच्या परीक्षेत १०० टक्के गुण मिळवून देशपातळीवर प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या ऐतिहासिक यशाने ठाणे शहराचे नाव देशाच्या नकाशावर पुन्हा एकदा उज्ज्वल केले आहे.

किमयाच्या या यशामागे तिचे अथक परिश्रम, अभ्यासातील सातत्य आणि जिद्द कारणीभूत आहे. शाळेचे प्राचार्य व शिक्षकांनी तिचे कौतुक केले असून, ठाणेकर नागरिकांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.किमया बोआ हिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात येत आहेत.